# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

सोलापूर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत खालील नमूद तक्त्यात विविध संवर्गातील पदे भरण्याकरिता त्यासाठी दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रता व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज दि. २९/०२/२०२० पर्यंत मागविण्यात येत आहेत. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना व इतर अटी, शर्ती सोलापूर महानगरपालिकेच्या संकेत स्थळी **www.solapurcorporation.in** वर उपलब्ध आहेत.

| अ. क्र. | पदनाम व एकवट मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | प्रवर्गानुसार आरक्षण (गट) | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १) | वैद्यकीय अधिकारी (अर्धवेळ)<br>रु. २४,०००/-<br>**Gynacologists** | एम. डी., ओ. बी. जी. वाय . / एम. एस. ओ. बी. जी. वाय. / डी. एन. बी. ओ. बी. जी. वाय. / डी. जी. ओ. | ४५ वर्षांपर्यंत व सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ६२ वर्षांपर्यंत राहील. | आरक्षण लागू नाही | ०३ |
| २) | ए. एन. एम.<br>रु. ८६४०/- | १० वी उत्तीर्ण व ए. एन. एम. कोर्स पास तसेच महाराष्ट्र नर्सिंगकडील नोंदणी आवश्यक अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | ३८ वर्षांपर्यंत | अजा- ०६<br>अज- ०२<br>विजा (अ)- ०१<br>भज(ब)- ०१<br>भज(क)- ०२<br>भज(ड)- ०१<br>विमाप्र- ०१<br>इमाव- ०७<br>एसईबीसी- ०८<br>ईडब्ल्यूएस- ०६<br>खुला- ०५ | ४० |
| ३) | फार्मासिस्ट<br>रुपये ८०००/- | **D Pharm, B Pharm**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील व फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक. अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | ३८ वर्षांपर्यंत | एसईबीसी- ०१ | ०१ |
| ४) | जी. एन. एम.<br>रुपये १२०००/- | १२ वी उत्तीर्ण व जी. एन.एम. कोर्स पास तसेच महाराष्ट्र नर्सिंगकडील नोंदणी आवश्यक. अनुभवी उमेदवारास प्राधान्य. | ३८ वर्षांपर्यंत | अज- ०१ | ०१ |

**नमूद पदासाठी आवश्यक असणाऱ्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे आहेत-**

१) **अर्ज करण्याची पद्धत :-** या जाहिरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये स्वाक्षरीसह अर्ज भरून त्यासोबत वयाचा दाखला, शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभवाचा दाखला तसेच आवश्यक ते साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जात विहित ठिकाणी अलीकडील काळातील उमेदवाराचा फोटो चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करावी. विहित नमुन्यात नसलेले अथवा अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

२) अर्जासोबत मागासवर्गीय उमेदवारांनी र. रु. १००/- व अमागास / खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी 'आयुक्त' सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या नावाच्या राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडणे आवश्यक आहे.

३) **उमेदवार निवडण्याची पद्धत -** १) अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षा / प्रात्यक्षिक परीक्षा / मुलाखतीकरिता बोलाविण्यासंबंधीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. २) अर्जाच्या छाननीत विशेष तज्ज्ञ पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवाराची अभ्यासक्रमावर आधारीत १०० गुणांची लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक वजा मुलाखत परीक्षा १०० गुणांची घेण्यात येईल. ३) अर्जाच्या छाननीत ए. एन. एम. व औषध निर्माता पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवाराची अभ्यासक्रमावर आधारीत वस्तुनिष्ठ प्रश्नांची लेखी परीक्षा ५० गुणांची व प्रात्यक्षिक / कौशल्य चाचणी परीक्षा २० गुणांची तसेच स्पॉट आयडेंटीफिकेशन परीक्षा १० गुणांची घेण्यात येईल. सदर परीक्षेमध्ये गुणवत्तेप्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत २० गुणांची घेण्यात येईल. ४) निवड झाल्यास नियमाप्रमाणे शारिरीकदृष्ट्या काम करण्यास सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र दिलेल्या मुदतीत सादर करावे लागेल. ५) सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र. बी. सी. सी. / २००९ / प्र. क्र. / २९१ / ०९ / १६ ब दि. ०५/११/२००९ नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ६) शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेकडे अर्ज सादर करताना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीत माहिती महापालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवारांच्या सेवा कोणत्याही टप्प्यात रद्द करण्याचे अधिकार महापालिकेस असतील. ७) निवड झालेल्या उमेदवाराविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही, असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून दिलेल्या मुदतीत सादर करावे लागेल. ८) सदर पदासाठी विहित केलेली अनुभवाची अर्हता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास नमूद केलेली अनुभवाची अट शिथील करणेबाबत विचार करण्यात येईल व त्याबाबतचे अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी राखून ठेवले आहेत. ९) जाहिरातीमधील नमूद पदसंख्या कमी अथवा अधिक तसेच कोणतेही भरती पदे रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. १०) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरतीप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी राखून ठेवले आहेत. ११) सोबतच्या नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरून दि. २९/०२/२०२० पूर्वी आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, मुख्य कार्यालय- डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३ ००१ या पत्त्यावर मिळतील, अशा पद्धतीने पाठवावेत. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही. लिफाफ्यावर ----- पदासाठी अर्ज असा स्पष्ट उल्लेख करावा. १२) सदरील पदे निव्वळ कंत्राटी पद्धतीने केवळ ११ महिने कालावधीसाठी भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

**विशेष सूचना -** १) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल. २) मध्यस्थ / ठक / महापालिकेत संबंध असलेचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे.

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १७/०२/२०२०

**सही/- मा. आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**